**ठळक बातम्या**

- जीएसटी कर परिषदेची ५६वी बैठक नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सुरु/ कररचनेत मोठ्या सुधारणांची शक्यता
- सेमिकॉन इंडिया २०२५ मधे सेमिकंडक्टर क्षेत्रातल्या तज्ञांबरोबर प्रधानमंत्र्यांचा संवाद
- नक्षलींचा बीमोड होईपर्यंत सरकार स्वस्थ बसणार नाही असा केंद्रीय गृहमंत्र्यांचा इशारा
- अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताचा युकी भांब्री न्यूझीलंडचा मायकल व्हीनसच्या साथीनं उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**आणि**

- देशाच्या विविध भागात मुसळधार पावसानं जनजीवनावर परिणाम

<><><><>

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५६वी बैठक नवी दिल्ली इथे सुरू आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन बैठकीच्या अध्यक्षस्थानी आहेत. दोन दिवसांच्या या बैठकीत अनेक राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री या बैठकीत सहभागी होत आहेत.

करांचं सुसूत्रीकरण आणि कर विवरणपत्र भरण्याच्या प्रक्रियेचं सुलभीकरण, यासह नव्या जीएसटी सुधारणांबाबत या बैठकीत चर्चा अपेक्षित आहे. जीएसटीचे फक्त ५ टक्के आणि १८ टक्के हे दोनच स्लॅब ठेऊन, १२ आणि २८ टक्क्याचे स्लॅब काढून टाकण्याचा निर्णय या बैठकीत होण्याची शक्यता आहे.

<><><><>

सेमिकॉन इंडिया २०२५ परिषदेच्या दुसऱ्या दिवशी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीमधल्या यशोभूमी इथं सेमिकंडक्टर क्षेत्रातल्या तज्ञांशी संवाद साधला. सेमिकंडक्टरशी संबंधित उत्पादनं आणि प्रकल्पांचीही त्यांनी पाहणी केली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णवही यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री मोदी आज सेमिकंडक्टर क्षेत्रातल्या उद्योगांच्या प्रमुखांच्या गोलमेज परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेत जगभरातील उद्योग प्रमुख उपस्थित असतील. भारतातील सेमिकंडक्टर परिसंस्था, तिची प्रगती आणि विकास यावर यात चर्चा होईल.

तीन दिवसीय सेमिकंडक्टर इंडिया २०२५ परिषदेचं काल प्रधानमं्त्र्यांच्या हस्ते उद्घाटन झालं.

<><><><>

सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वोन्ग सध्या भारत दौऱ्यावर आले असून आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर त्यांची द्विपक्षीय चर्चा होणार आहे. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे मुद्देही चर्चेत असतील. वोंग यांचं काल नवी दिल्लीत आगमन झालं. आज त्यांनी राजघाटावर जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या समाधीचं दर्शन घेतलं आणि आदरांजली वाहिली. आपल्या तीन दिवसांच्या भारत दौऱ्यात वोंग राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील. केंद्र सरकारच्या ॲक्ट ईस्ट धोरणानुसार, सिंगापूर हा भारताचा महत्त्वाचा भागीदार असून उभय देशातले परस्पर सौहार्दाचे संबंध आता धोरणात्मक भागीदारीमध्ये परावर्तित झाले आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याशी वोंग यांनी काल चर्चा केली.

<><><><>

चीनने आज बिजिंगमधे हायपरसोनिक क्षेपणास्त्रं, इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणालीसह अत्याधुनिक लष्करी तंत्रज्ञानाचं अनावरण केलं. दुसऱ्या महायुद्धातील चीनच्या विजयाला ८० वर्षे झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात हे अनावरण झालं, यावेळी चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी शांतता आणि जागतिक सहकार्याचा संदेश दिला. तियानमेन चौकात आयोजित परेडमधे एक हजारांहून अधिक शस्त्रास्त्रांचं प्रदर्शन करण्यात आलं. यात दहा हजारांहून अधिक लष्करी जवान, शंभरहून अधिक विमानं सहभागी झाली होती.

<><><><>

नक्षलींचा बीमोड होईपर्यंत सरकार स्वस्थ बसणार नाही असा इशारा देत ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षली चळवळ संपुष्टात येईल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. छत्तीसगडमध्ये नक्षलींविरोधातलं ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट यशस्वीरीत्या राबवणाऱ्या

सीआरपीएफ, छत्तीसगड पोलीस आणि कमांडोंचं शहा यांनी अभिनंदन केलं, त्यावेळी ते बोलत होते. परिस्थिती प्रतिकूल असतानाही सुरक्षा दलांनी नक्षलींचे तळ उद्ध्वस्त केले, नक्षलविरोधी अभियानात जवानांना दाखवलेलं शौर्य इतिहासाच्या पानांवर सुवर्ण अक्षरात लिहिलं जाईल असे गौरवोद्गार शहा यांनी काढले. या मोहिमेत गंभीर जखमी झालेल्या जवांना सरकार सर्वोतोपरी मदत करेल, असं आश्वासन शहा यांनी दिलं.

या मोहिमेत सुरक्षा दलांच्या कारवाईत ३१ नक्षली ठार झाले. २१ एप्रिल ते ३१ मे दरम्यान ही मोहीम राबवली गेली.

<><><><>

छत्तीसगडमध्ये, सुरक्षा दलांनी गेल्या 24 तासांत बिजापूर जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणांहून सोळा माओवाद्यांना अटक केली. विविध सुरक्षादलांच्या संयुक्त पथकानं जिल्ह्यात माओवादविरोधी मोहीम राबवली होती. त्यांच्या ताब्यातून स्फोटकं आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलं आहे.

<><><><>

औषध आणि संबंधित संशोधन क्षेत्रात नियामक अनुपालनाची प्रक्रिया सुलभ व्हावी या उद्देशाने नवीन औषधे आणि चाचण्या अधिनियम २०१९मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. आरोग्य मंत्रालयाने या अधिनियमासंदर्भात सूचना आणि हरकती मागवल्या आहेत. नवीन नियमांनुसार आता काही अपवादात्मक श्रेणीतली औषधं वगळता अन्य औषधांच्या परवान्यासाठी आता जास्त वेळ वाट पाहावी लागणार नाही.

<><><><>

महाराष्ट्रात ओबसी समाजाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी राज्य मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं. महायुतीतल्या तिन्ही पक्षाचे प्रत्येकी दोन दोन मंत्र्यांचा या समितीत समावेश असेल, अशी माहिती त्यांनी दिली.

<><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताचा युकी भांब्री आणि न्यूझीलंडचा मायकल व्हीनस या जोडीनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. त्यांनी

उपउपांत्यपूर्व फेरीत जर्मनीच्या जोडीचा ६-४, ६-४ असा सरळ सेट्समध्ये पराभव केला. आता त्यांचा पुढचा सामना क्रोएशियाचा निकोला मेकटिच आणि अमेरिकेचा राजीव राम या जोडीशी होणार आहे.

पुरुष एकेरीत अग्रमानांकित यानिक सिनर, दुसऱ्या क्रमांकावर असलेला कार्लोस अल्काराज आणि २४ वेळा ग्रँडस्लॅम विजेता नोव्हाक जोकोविच यांनी पुढची फेरी गाठली. तर महिला एकेरीत मार्केटा वाँड्रुसोव्हा हिनं दुखापतीमुळे माघार घेतल्यानं अग्रमानांकित अरीना साबालेंका हिला पुढच्या फेरीत प्रवेश मिळाला.

<><><>

बिहारमध्ये सुरू असलेल्या आशिया चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत सुपर फोर सामने आजपासून सुरू होणार आहेत. भारतासह चीन, मलेशिया आणि कोरिया हे संघ या फेरीत दाखल झाले आहेत. सुपर फोरमध्ये आज संध्याकाळी साडेसात वाजता भारताचा सामना कोरियाशी होईल. तर त्याआधी दुसऱ्या सामन्यात मलेशियासमोर चीनचं आव्हान असेल. हरमनप्रीत सिंहच्या नेतृत्वात भारतीय संघानं साखळी फेरीतले सर्व सामने जिंकले आहेत.

<><><>

पाकिस्तानात क्वेटा इथं आज झालेल्या स्फोटात १४ जण ठार झाले तर ३५ जण जखमी झाले. बलुचिस्तान नॅशनल पार्टी या राजकीय पक्षाचे संस्थापक सरदार अताउल्ला मेंगल यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त क्वेटा इथे एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमानंतर हा स्फोट झाला.

<><><>

पूर्व अफगाणिस्तानात झालेल्या विनाशकारी भूकंपातील मृतांची संख्या 1400 हुन अधिक झाली आहे तर हजारो लोक जखमी झाले आहेत. बचाव कार्य सुरू असताना रविवारी अफगाणिस्तानच्या पूर्व भागात 6 रिक्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. भारतानं अफगाणिस्तानला मानवतावादी दृष्टिकोनातून मदत पाठवली आहे. काल 21 टन मदत साहित्य विमानाने पाठवण्यात आलं.

<><><>

देशाच्या विविध भागत मुसळधार पावसामुळे अद्यापही जनजीवन विस्कळीत अवस्थेत आहे.

जम्मूकाश्मिरमधे नदी नाल्यांचे प्रवाह वाढले असून श्रीनगर - जम्मू महामार्ग बंद पडला आहे. झेलम आणि तिच्या उपनद्या धोक्याच्या पातळीवरुन वाहत असून अनेक ठिकाणी दरडी कोसळून रस्ते बंद पडले आहेत. राज्यात शाळा महाविद्यालंयांना आज सुट्टी दिली आहे. हरियाणा आणि पंजाबधेही अद्याप नद्यांचे प्रवाह वाढलेले असून अनेक वस्त्यांमधे पाणी शिरलं आहे.यमुना नदी दिल्लीमधेही धोक्याच्या पातळीवरुन वाहत आहे.

गुजरातमधे पुढचे दोन दिवस सुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेऊन प्रशासन सतर्क आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीर, लडाख, छत्तीसगड, पूर्व राजस्थान, गुजरात, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मध्य प्रदेश, हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि हिमाचल प्रदेश, ओडिशा आणि विदर्भातील काही ठिकाणी आज मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. देशाच्या ईशान्य भागात आणि दक्षिणेकडेही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. येत्या आठवड्यात देशाच्या पूर्वेकडील राज्यांमध्ये आणि मध्य भागात वादळ आणि विजांसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान खात्याचा अंदाज आहे. पुढील पाच दिवसांत कोकण आणि गोवा किनाऱ्यावर मच्छीमारांनी जाऊ नये असा सल्लाही देण्यात आला आहे.

**//<><><><>//**